



आर. एन्. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

वर्ष : तेरावे    अंक : दुसरा
ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०२२

संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
कार्यकारी संपादक
डॉ. शिवाजीराव देशमुख
मार्गदर्शक
डॉ. अरुण प्रभुणे
संपादक मंडळ
डॉ. विजय वारकड    डॉ. दीपक चिद्दरवार
डॉ. रत्नाकर बेडगे    डॉ. संदीप सांगळे
अमेरिकेतील समन्वयक
रमेश देशपांडे • किशोर व ब्रिजेट करकेरा • सोनाली जांभेकर

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५.
मुद्रक : श्री. जे. प्रिंटर्स, प्रा.लि., १४१६, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०
साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता : डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com.

वार्षिक वर्गणी : रु. ५००/-    द्विवार्षिक वर्गणी : रु. ९००/-
पंचवार्षिक वर्गणी : रु.२०००/-    अंकाचे मूल्य : रु. १२५/-

* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.
* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune
CHAKAN 410501

R. N. I. FOR INDIA New Delhi
R. No. – MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# AKSHAR WANGMAY

**Year : 13 Volume : 2**
**October-November-December 2022**

Editor-in-Chief
**Dr. Nanasaheb Suryawanshi**

Executive Editor
**Dr. Shivajirao Deshmukh**

Advisor
**Dr. Arun Prabhune**

Editorial Board

**Dr. Vijay Warkad** · **Dr. Deepak Chiddarwar**
**Dr. Ratnakar Bedge** · **Dr. Sandeep Sangle**

U.S.A. Coordinator
**Ramesh Deshpande • Kishore & Bridget Karkera • Sonali Jambhekar**

Publisher : Sou. Rekhatai Nanasaheb Suryawanshi, Pratik Prakashan, 'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515

Printer : Shri. J. Printers Pvt.Ltd. 1416, Sadashiv Peth, Pune 411 030

**Address for sending articles and fees :** Dr. Nanasaheb Suryawanshi
'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515
District : Latur
Mobile phone : 9423655841
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

**Subscription Rates Yearly :** Rs. 500/-
**Two years :** Rs. 900/-
**Five Years :** Rs. 2000/-
**Current Volume :** Rs. 125/-

* Maharashtra State Literary and Cultural Board has granted funds for the Publication of this Journal. But Maharashtra State Literary and Cultural Board has not been responsible for writers opinion in this Journal.

* The content and opinions expressed in the articles are the views of the authors and do not necessarily reflect the views and opinions of the periodical's Editorial Board, publisher or the advisor. The authors are solely responsible for the facts and accuracy of the content of the articles.

## अनुक्रम

- संपादकीय ---------- ४
- मुखपृष्ठाविषयी ---------- ५
- चंद्रकांत पाटील यांची कविता ---------- ४८
  **सुधीर रसाळ**
- आदिवासींची निसर्गसंस्कृती आणि आयुर्वेद ---------- १०५
  **डॉ. कैलास महाले**
- पाथेय ---------- १११
  **मधु जामकर**
- शाश्वत, मानवतावादी विचारधारेचे पाईक : सत्यशोधक मुकुंदराव पाटील ---------- ११७
  **डॉ. शिवाजी एंडाईत**
- गावाकडच्या माणसांच्या काळीज तोडणाऱ्या गोष्टी : 'काळीज विकल्याची गोष्ट' ---------- १२६
  **बाबाराव मुसळे**
- ज्ञानपीठ साहित्यिक प्रतिभा राय ---------- १३१
  **डॉ. ऊर्मिला चाकूरकर**
- 'अक्षरवाङ्मय'चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार ---------- १४४
- संपादक मंडळ ---------- १४६

C.S.M.'s Arts & Com. College ★ CHAKAN 410501 ★ Tal-Khed, Dist-Pune.



Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune

वळण भावनाशून्य नाही. म्हणूनच तर ही वणवण गुंजारव झाली. कृतज्ञतेकडून कृतार्थतेकडे वळली. या प्रवासात पानाआड दडलेले फूल दिसत नाही. मात्र त्याचा परिमळ, त्याच्या शोधाकडे टक लावून पाहतो. मी जो शोध घेतो तो विद्यार्थी 'माझिया जातीचा भेटो मज कोणी' च्या न्यायाने आपल्या कक्षा विस्तारीत स्वतः रुंदावत जातो. एखाद्या ओबडधोबड दगडातून नवी मूर्ती आपण घडवीत असतो. त्यातला शोध शिक्षकी पेशात कधीच संपणारा नसतो. आपली संस्कार देण्याची वृत्ती या संवेदनाक्षम विद्यार्थ्यांना जीवनभरची शिदोरी वाटली पाहिजे. मी कमविले काय अन् मी गमावले काय हे गणित विद्यार्थी समांतर कधी सुटते ते कळत नाही की वळत नाही. आजच्या यांत्रिक युगात जो हावरट बाजार भरला आहे त्यात वधारलेला भाव किती व कुणी सांभाळावा हा एक पुन्हा नव्याने प्रश्नउत्तर न देता खडा केला आहे. अशा वेळी परंपरोने आपल्या पुढे ठेवलेला शिक्षण क्षेत्रातला कार्यक्रम सतत जागृतीला उदास करणारा आहे. शिक्षण जेव्हा पोटाचा विचार करते तेव्हा ते विविध अंगाने पोटभर पाहिले जात नाही. आपल्या परंपरेत जे योद्धे निर्माण झाले, जे नेते उदयाला आले, जे कार्यकर्ते आचारवंत झाले तेच आपले हिरवळ दाखविणारे ओयासीस आहेत. शिक्षण संस्थेच्या ठराविक चौकटीतून बाहेर पडताना माझ्या पोपटाने आपला पिंजरा मोकळा केल्याचा आनंद अवर्णनीय व स्मरणीय झालेला आहे. आपण आखलेल्या घराच्या भिंती ओलांडणे याचा अर्थ क्षितिज गवसणे असा होतो. मात्र शिक्षक हा त्या पोपटाप्रमाणे या पिंजऱ्याचा वाली नाही की पोपटपंची करणारा प्राणी नाही. तो आकाशात झेप घेताना आपल्या घराकडे नजर ठेवणारा एक पक्षी आहे. आपल्या अध्ययन-अध्यापनातील झेप उंचवताना शिक्षकाला जे पाथेय त्याच्या या कुडीतून मिळते त्यातला आत्मा निवृत्त होतो एवढेच. मी आपला नवे वस्त्र परिधान करताना जुने वस्त्र बाजूला सारतो. ही तर आपली परंपरा असेल तर त्यातले नवेपण नव्या हुरुपाने सांभाळणे ही आपल्या सतत जवळ असणाऱ्या 'पाथेया'ला नवतापूर्ण झालेली कामगिरी का म्हणू नये?

– मधु जामकर

'दिलासा' स्नेह नगर, परळी वैजनाथ जि. बीड,

भ्रमणध्वनी – ९८५०२९४६८६

□□□



# शाश्वत, मानवतावादी विचारधारेचे पाईक : सत्यशोधक मुकुंदराव पाटील

– डॉ. शिवाजी एंडाईत

'सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदाराव पाटील' हा चरित्रग्रंथ तीन भागात विभागलेला आहे. चरित्रग्रंथाच्या पहिल्या भागात लेखकाने सत्यशोधक भालेकर घराण्याचा इतिहास व कर्तव्यतत्पर प्रतिभावंत भालेकरांच्या जीवनकार्याचा आलेख मांडला आहे. तर दुसऱ्या भागात लेखक, कवी, नाटककार, कथा-कांदबरीकार, मुकुंदराव यांच्या कार्याचे महत्त्व व वेगळेपण विस्तृतपणे शब्दबद्ध केले आहे. तिसऱ्या परिशिष्टाच्या भागात लेखकाने मुकुंदरावांचा संक्षिप्त जीवनपट, भालेकर कुटुंबाची वंशावळ, दीनमित्रकारांचा पत्रव्यवहार व अग्रलेख इ.चा लेखाजोखा घेतलेला आहे.

सत्यशोधक भालेकर घराण्याचा इतिहास अधोरेखित करण्यापूर्वी लेखकाने महाराष्ट्र व भारतातील समकालीन वास्तव पार्श्वभूमी चित्रित केलेली आहे. इ.स. १७७२ ते १८१८ कालखंडात पेशवाई प्रशासनात ब्राह्मणांचा आणि त्यातही चित्पावन ब्राह्मणांचा प्रभाव वाढलेला होता, त्यांची कटकारस्थाने वाढली होती, दलित-बहुजनांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होत होता, अस्पृश्यांचे प्रचंड शोषण सुरू होते, शेतकरी नागवला होता, माणुसकी रसातळाला पोहोचली होती, रयतेची प्रचंड पिळवणूक होत होती, जातिभेद, भ्रष्टाचार, व्यभिचार, स्वैराचार आदीचे अराजक माजले होते. अशा विपन्न, विपरीत सामाजिक परिस्थितीत इंग्रज अधिकारी रॉबिन्सनने शनिवारवाड्यावर ब्रिटीश साम्राज्याचा राष्ट्रध्वज फडकविला आणि भारतभर इंग्रजी अंमल सुरू केला. बीभत्स, किळसवाण्या जुलमी पेशवाईचा डोलारा इंग्रजांनी जमीनदोस्त, नेस्तनाबूत केला. या आमूलाग्र बदलाचे अनेक परिणाम भारतीय समाज जीवनात घडू लागले.



C.S.M's Arts & Comm. College CHAKAN 410501 Tal-Khed, Dist-Pune.
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan Tal-Khed Dist-Pune